## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.५ (प्रतिनिधी ) महाराष्ट्रातील लोककला लोप पावत चालल्या असून या लोककलांचा अभ्यास करुन त्या जतन व संवर्धन करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी घ्यावी असे आवाहन भारतीय संगीत व नाटक अकादमीचे सदस्य डॉ. जयंत शेवतेकर यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरु झालेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे लोककला महोत्सवाच्या समारोप प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.शेवतेकर बोलत होते. यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिसभा सदस्य, दिनेश खरात, प्राचार्य एस.आर.पाटील, प्रा. कांचन महाजन, नेहा जोशी, लोककलावंत विनोद ढगे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, कला व मानव्यविद्या प्रशाळेचे प्रमुख डॉ. राम भावसार उपस्थित होते.

डॉ. शेवतेकर पुढे म्हणाले की, लोककला हया भारतीय संस्कृतीचे वाहक आहे. या लोककला जिवंत राहण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे अधिसभा सदस्य डॉ. दिनेश खरात यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना विद्यार्थ्यांना आवाहन केले की, मोबाईल व रिल्स मध्ये वेळ वाया न घालवता लोककला जोपासण्याचे कार्य हाती घ्यावे. कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी याप्रसंगी सांगितले की, विद्यापीठाने लोककला विभाग स्थापन करण्यासाठी शासनानेकडे प्रस्ताव सादर केला आहे. त्याकरीता प्राधिकरणाचे सदस्य व विद्यापीठ प्रशासन पाठपुरावा करुन लोककला विभाग स्थापन करणेबाबत विद्यापीठ सकारात्मक प्रयत्न करीत आहे.

अध्यक्षीय समारोप करतांना व्य.प.सदस्य राजेंद्र नन्नवरे यांनी सांगितले की, लोककला व लोकसंस्कृती हे महाराष्ट्राचे वैभव आहे. भारताची सौम्य संपदा लोककले मध्ये आहे. भारत या सौम्य संपदेमध्ये आघाडी घेत आहे. भारतातील भरतनाटयम, कथ्थक, स्थापत्यशास्त्र, महिलांची साडी वेशभूषा, भारतीय चित्रपट यासर्वांचे आकर्षण जगात आहे. भारतातील लोककलांचा अभ्यास जगातील काही देश करीत आहे. लोककलांच्या माध्यमातून सध्या समाजप्रबोधनाचे काम सुरु आहे.

सुरुवातीस डॉ. जयेंद्र लेकरवाळे यांनी लोककला महोत्सवाचा अहवाल सादर केला. सूत्रसंचालन प्रा.वीणा महाजन तर आभार डॉ. राम भावसार यांनी मानले. सकाळच्या सत्रात लोककलावंत विनोद ढगे यांनी भारुड गीते सादर केली. त्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांसमवेत मुक्तसंवाद आयोजित करण्यात आला. या लोककला महोत्सवात ३५ महाविद्यालयातील १३१ विद्यार्थी कलावंतांनी सहभाग नोंदविला.

या लोककला महोत्सवात उत्कृष्ट लोककला सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना मंचावरील मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. यामध्ये नंदुरबार जिल्हा उत्कृष्ट विद्यार्थी कलावंत जागृती पाटील (जीटीपी महाविद्यालय, नंदुरबार) व उत्कृष्ट विद्यार्थी कलावंत देविदास पावरा (कला, वाणिज्य व विज्ञन महाविद्यालय, तळोदा), धुळे जिल्हा उत्कृष्ट विद्यार्थी चिराग महाजन (झेडबी.पाटील महाविद्यालय, धुळे) उत्कृष्ट विद्यार्थिनी आदिती शिंदे (आरसी पटेल फार्मसी- पीआयपीआर महाविद्यालय, शिरपूर) तर जळगाव जिल्हा उत्कृष्ट विद्यार्थी संकेत पाटील (जी.जी.खडसे महाविद्यालय, मुक्ताईनगर) उत्कृष्ट विद्यार्थिनी प्रतिभा वळवी (सामाजिकशास्त्रे प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव) यांचा समावेश होता.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. ५ ( प्रतिनिधी) ज्ञान सामुग्रीच्या पुर्नरचनेत आपला वाटा असावा आणि संशोधनामुळे आपल्या ज्ञानात भर पडणार असेल व ते समाजपयोगी ठरत असेल तरच संशोधनाकडे वळावे असे स्पष्ट प्रतिपादन जेष्ठ संशोधक व अहिल्यादेवीनगर येथील प्रा.डॉ.सुधाकर शेलार यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील मराठी विभागाच्या वतीने बुधवार दि. ५ मार्च रोजी संशोधन प्रकल्प लेखन या विषयावर झालेल्या राष्ट्रीय कार्यशाळेत बीजभाषण करतांना डॉ.शेलार बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा.म.सु.पगारे होते. कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले. डॉ.शेलार यांनी बीजभाषणात संशोधनाविषयी सविस्तर मांडणी केली. ते म्हणाले की, संशोधन ही मानवाची उपजत प्रवृत्ती आहे. असलेल्या संशोधनात काय उणीवा आहेत, त्या दुर करून काय करता येईल यांचा विचार करुन संशोधन केले तर पुढचे पाऊल पडेल. मात्र तसे होत नाही. शब्दप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य आणि पुर्वापार चालत आलेले समज यामध्ये आपण अडकून पडत स्थितीवादी झालो आहोत. त्यामुळे ज्ञानसामुग्रीच्या या पुर्नरचनेत आपला वाटा असणे गरजेचे आहे. आपल्या भोवतीच्या पिरस्थितीतून संशोधनाचा विषय सुचत असतो असे सांगुन त्यांनी संशोधकाकडे कोणते गुण असायला हवेत हे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.म.सु.पगारे यांनी संशोधन हे सत्यशोधनासाठी असते. संशोधनासाठी चिंतन आणि मननाची गरज असल्याचे सांगितले. डॉ.विनोद पाटील यांनी या कार्यशाळेमुळे नवीन संशोधकांना चालना मिळेल असा विश्वास व्यक्त केला. प्रारंभी समन्वयक डॉ.दीपक खरात यांनी प्रास्ताविक केले.यावेळी ४५ शोध निबंधाच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. दुपारच्या सत्रात संशोधन प्रकल्प लेखनाचे नियोजन यावर डॉ.भूपेंद्र केसुर यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा झाली यामध्ये प्रा.नितीन पाटील,डॉ.शशिकांत सोनवणे यांनी आपली भूमिका मांडली. तिसऱ्या सत्रात सहभागी प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांचे निबंध वाचन झाले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन खेमराज पाटील यांनी केले. नेत्रा उपाध्ये यांनी आभार मानले.

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. ३**

जळगाव दि. ५ ( प्रतिनिधी) गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने चंद्रपूर येथे झालेल्या आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत ८०० मिटर धावण्याच्या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केलेल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची विद्यार्थिनी शेवंता पावरा हिला कुलगुरु प्रा. व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते विद्यापीठाच्या वतीने सरावासाठी स्पोर्टस् शुज देण्यात आले.

विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे लोककला महोत्सवात हे शुज तिला देण्यात आले. शेवंता पावरा ही शिरपुरच्या एच.आर.पटेल महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे.प्रतिकुल परिस्थितीत ती धावण्याचा सराव करते. तिच्या या मेहनतीचे फळ क्रीडा महोत्सवात प्राप्त झाले. भविष्यात दैनंदिन सरावात खंड पडू नये यासाठी विद्यापीठाने नाईके कंपनीचे स्पोर्टस् शुज तिला उपलब्ध करुन दिले. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, व्य.प.सदस्य राजेंद्र नन्नवरे,प्रा.शिवाजी पाटील, ॲड . अमोल पाटील, नितीन झाल्टे, डॉ. पवित्रा पाटील, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिसभा सदस्य डॉ. ऋषीकेश चित्तम, अधिष्ठाता प्राचार्य डॉ. जगदीश पाटील, प्राचार्य एस.आर.पाटील, डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील उपस्थित होते.

.................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ५ मार्च, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी